लोकमत कोल्हापूर, शुक्रवार, दि. १५ फेब्रुवारी २०१९

महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या वेगळेपणाचा शोध

सुनीलकुमार लवटे : विवेकानंद महोत्सव; चैतन्यातच विवेकाचा आनंद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महोत्सव विद्यार्थ्यांमधील वेगळेपणाचा शोध आणि वेध घेणारा आहे. यातूनच वेगळा कलाकार विद्यार्थी तयार होईल. या वेगळेपणातच चैतन्य आहे आणि चैतन्यातच विवेकाचा आनंद आहे, असे विचार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

विवेकानंद स्वायत्त कॉलेजच्या वतीने गुरुवारी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'विवेकानंद महोत्सव - शोध चैतन्याचा' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले अध्यक्षस्थानी होते.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांच्या दर्शनासह कलाविष्कार ही व्यक्तिगत स्वातंत्र्याला मिळालेली संधी असते. वक्तृत्व व अभिवाचन हे आपल्यातील आत्मविश्वास जागा करते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्वप्नातील आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारांची गरज आहे. यासाठी या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात गुरुवारी 'विवेकानंद महोत्सव - शोध चैतन्याचा' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. युवराज भोसले, डॉ. श्रुती जोशी, डॉ. एस. वाय. होनगेकर, विशाल पाटील उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. युवराज भोसले म्हणाले, हा महोत्सव विद्यार्थ्यांमधील बलस्थानांना वाव व ऊर्जा देणारा आहे. त्यांच्यातील आत्मविश्वास जागा करणारा आहे. यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रेरणा पाटील व स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. शुभम कळके याने आभार मानले. स्पर्धांमध्ये कोल्हापूर, रायगड, पुणे, सांगली, सातारा येथील महाविद्यालयीन स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र, बक्षीस

- महोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेत सांगलीच्या शांतिनिकेतनची अलिशा मोहिते हिने प्रथम, रुकडीच्या राजर्षी शाहू कॉलेजच्या अभिजित बिरनाळेने द्वितीय, तर विवेकानंद कॉलेजच्या सौरभ पाटीलने तृतीय क्रमांक पटकाविला.
- अभिवाचन स्पर्धेत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरजचा प्रथम, विवेकानंद कॉलेजचा द्वितीय तर कमला कॉलेजचा तृतीय क्रमांक आला. विजेत्यांना रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात आले.

आज महोत्सवात

आज, शुक्रवारी नावीन्यपूर्ण संशोधन व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व उद्या, शनिवारी शॉर्ट फिल्ममेकिंग व चित्रकला स्पर्धा होणार आहेत.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । शुक्रवार, १५ फेब्रुवारी २०१९

एमपीएससीत चौघे झळकले

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेतून जिल्ह्यातील चौघांनी बाजी मारली आहे. उत्पादन शुल्क उपअधीक्षक पदाच्या परीक्षेत सातवे (ता. पन्हाळा) येथील प्रसन्नजित प्रकाश चव्हाण याने राज्यात पहिला, तर गारगोटी येथील सूरज सुरेश बेलेकर याने कक्ष अधिकारी पदाच्या परीक्षेत तिसरा क्रमांक पटकावला. प्रमोद डुके याने सहायक आयुक्तपदाच्या परीक्षेत पाचवा क्रमांक पटकावला. अनुप पाटील याची उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाली आहे.

मुख्य परीक्षेचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. एकूण १३६ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली होती. मुख्य परीक्षेसाठी २३८१ उमेदवार पात्र ठरले होते. त्यातून मुलाखतीसाठी ४२७ उमेदवार निवडण्यात आले होते.

प्रसन्नजितने ९०० पैकी ५४८ गुण मिळवले. त्याने मेकॅनिकल इंजिनीअरची पदवी वारणानगर

प्रमोद डुके

सूरज बेलेकर

येथील तात्यासाहेब कोरे इंजिनीअरिंग कॉलेजमधून घेतली. त्याचे वडील प्राथमिक शिक्षक आणि आई प्रतिभा गृहिणी आहेत.

कक्ष अधिकारी पदी निवड झालेला सूरज बेलेकरने ९०० पैकी ५३९ गुण मिळवले. तो गारगोटी येथील रहिवासी आहे. २०१५ पासून तो स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. सूरजचे वडील पतसंस्थेत नोकरी करतात. तर आई गृहिणी आहे. सूरज बेलेकर याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गारगोटी येथील मौनी विद्यापीठात झाले. त्याने आयटी विषयात पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. २०१३ मध्ये त्याने केआयटी कॉलेजमधून माहिती व तंत्रज्ञान विषयातील अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. पदवीनंतर त्याने काहीकाळ गारगोटी येथील आयसीआरई कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

कसबा बावडा येथील प्रमोद डुके हा २०१३ पासून स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता. त्याचे वडील निवृत्त मुख्याध्यापक असून आई गृहिणी आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना राहुल पाटील व ज्ञानदेव भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले.प्रमोदने ५४९ गुणांसह सहायक आयुक्तपदाच्या परीक्षेत राज्यात पाचवा क्रमांक पटकावला. त्याचे माध्यमिक शिक्षण कोल्हापुरात प्रायव्हेट हायस्कूलमध्ये, तर बारावीचे शिक्षण विवेकानंद कॉलेजमधून, तर माहिती व तंत्रज्ञान विषयातील पदवीचे शिक्षण केआयटी कॉलेजमधून पूर्ण केले. त्यानंतर दोन वर्षे पुण्यातील खासगी कंपनीत नोकरी केली.

अनुप पाटील याने ५५५ गुण मिळवत उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदी निवड झाली. त्याचे वडील शेतकरी आणि आई सुरेखा गृहिणी आहेत. त्याने संजय घोडावत इन्स्टिट्यूटमधून बी. ई. मेकॅनिकलची पदवी घेतली आहे.

महासत्ता
शुक्रवार, १५ फेब्रुवारी २०१९

राज्यसेवा मुख्य परीक्षेत कोल्हापूरच्या तिघांचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या राज्य सेवा मुख्य परीक्षेचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. या परीक्षेतून राज्यातील १३६ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील आशिष बारकुल सर्वसाधारण प्रवर्गातून प्रथम, महेश जमदाडे मागासवर्गीय प्रवर्गामध्ये प्रथम तर पुणे जिल्ह्यातील स्वाती दाभाडे हिने मुलींमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तर प्रमोद दुके (रा. कसबा बावडा), सूरज बेलेकर (गारगोटी), प्रसन्नजीत चव्हाण (सातवे, ता. पन्हाळा) हे तीन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

प्रमोद दुके

सूरज बेलेकर

प्रसन्नजीत चव्हाण

राज्यसेवा मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची माहिती समजताच त्यांच्यासह मित्रांनी आनंदोत्सव साजरा केला. या यशामुळे त्यांच्यावर सर्वस्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

पान ६ पहा

पुढारी | शुक्रवार, १५ फेब्रुवारी २०१९

निबंध स्पर्धेत विशाल कुंभार राज्यात दुसरा

पोहाळे तर्फ आळते (वार्ताहर) : अखिल भारतीय निबंध लेखन स्पर्धेत पोहाळे तर्फ आळते (ता. पन्हाळा) येथील विशाल अनिल कुंभार (विवेकानंद कॉलेज) याने महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवला. शाहू स्मारक भवन येथे झालेल्या समारंभात त्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हार्टफूलनेस सेंटरच्या वतीने विभागीय संयोजक नितीन भोसले व प्रेरणा शिंदे यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पांडल्या.

तरुण भारत
शुक्रवार, १५ फेब्रुवारी २०१९

राज्यसेवा मुख्य परीक्षेत कोल्हापूरच्या तिघांचे यश

पान १ वरून

अभ्यासात चिकाटी महत्त्वाची : प्रमोद दुके

प्रायव्हेट हायस्कूलमधून प्राथमिक व माध्यमिक तर विवेकानंद कॉलेजमध्ये अकरावी बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. केआयटी कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स विभागातून पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर एका खासगी कंपनीत नोकरी केली. २०१४ ते २०१८ पर्यंत एमपीएसीचा अभ्यास केला. अभ्यासक्रमाशी निगडित पुस्तकांचा सलग ८ तास अभ्यास केल्यामुळेच हे यश मिळाले आहे. या यशामागे शिक्षक, आई-वडील, सर्व कुटुंबीय व मित्रांचे मोठे योगदान आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना काय वाचले पाहिजे यापेक्षा काय वाचू नये हे समजून घेतल्यास यश मिळते. तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम व चिकाटी अतिशय महत्त्वाची आहे, असे मत असिस्टंट कमिशनर इन सेल्स टॅक्सपदी निवड (जीएसटी डिपार्टमेंट) झालेल्या प्रमोद दुके यांनी व्यक्त केले.

कठोर परिश्रमाची गरज : सूरज बेलेकर

पहिली ते दहावीपर्यंत मौनी विद्यापीठात शिक्षण घेतले. त्यानंतर आयसीआरई इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील अॅन्ड रूरल इंजिनिअरिंग गारगोटी येथे डिप्लोमा केला. त्यानंतर केआयटी कॉलेजमधून आरटीमध्ये डिग्री पूर्ण केली. स्टडी सर्कल कोल्हापूर येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला. तिसऱ्या प्रयत्नात हे यश मिळाले आहे. कठोर परिश्रम केले पाहिजे. या यशासाठी शिक्षक तसेच आई, वडील व कुटुंबीय तसेच मित्र परिवाराचे सहकार्य लाभले. परीक्षेच्या दृष्टिकोनातून प्रश्नपत्रिका सोडवण्याचा सराव करणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे मत कक्ष अधिकारीपदी निवड झालेल्या सूरज सुरेश बेलेकर यांनी व्यक्त केले.

अभ्यासात सातत्य हवे : प्रसन्नजीत चव्हाण

प्राथमिक शिक्षण पन्हाळा तालुक्यातील आरळे तर माध्यमिक शिक्षण सातवे हायस्कूल येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावीपर्यंत विवेकानंद कॉलेजमध्ये व इंजिनिअरिंगचे शिक्षण तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज, वारणानगर येथे झाले. तिसऱ्या प्रयत्नात हे यश मिळाले आहे. नियमित दिवसातून १३ ते १४ तास अभ्यास केला. विद्यार्थ्यांनी अपयशाला खचून न जाता अभ्यासात सातत्य ठेवले तर यश निश्चित मिळते, असे मत उत्पादन शुल्क उपअधीक्षकपदी निवड झालेल्या प्रसन्नजीत चव्हाण यांनी व्यक्त केले.

तरुण भारत
दि. १६-०२-२०११

'विल यु बी माय व्हॅलेंटाईन...'

व्हॅलेंटाईन डे उत्साहात साजरा : महाविद्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रेमाचा महिना..., प्रेमाचा दिवस आणि आपल्या प्रिय व्यक्तीला आपल्या मनातील भावना मोकळेपणाने बोलून दाखवत गुरुवारी तरुणाईने व्हॅलेंटाईन डे साजरा केला. आपल्या मनातील भावनांना 'विल यु बी माय व्हॅलेंन्टाईन" अशा शब्दांत वाट करून दिली. प्रिय व्यक्तीना भेट वस्तू दिल्या.

तरुण – तरुणींसाठी १४ फेब्रुवारी हा दिवस म्हणजे पर्वणीच असते. फेब्रुवारी महिना प्रेमाचा महिना म्हणून ओळखला जातो. 'व्हॅलेंटाइन डे"ची सुरुवात एका आठवड्यापूर्वीच होते. 'व्हॅलेंटाईन डे" हा या आठवड्याचा जरी शेवटाचा दिवस असला तरी प्रेमवीरांसाठी त्यानंतरचा प्रत्येक दिवस तितकाच खास असतो. तरुण मुले –मुली हा दिवस अगदी जल्लोषात साजरा करतात.

कोल्हापूर : व्हॅलेंटाईन डे च्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध महाविद्यालयांबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. (छाया. इम्रान गवंडी)

शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यासाठी तरुण–तरुणीं सकाळपासूनच सज्ज होते. रंकाळा तलाव, पदपथ उद्यान, कोटीतीर्थ, महावीर गार्डन, हुतात्मा पार्क येथे प्रेमीयुगुलांची गर्दी दिसून आली. आपल्या लाडक्या व्यक्तीस त्याच्या आवडीची भेट वस्तू देण्यासाठी आजची संधी साधली. लाल, गुलाबी, पिवळ्या रंगाची गुलाबाची फुले देवून आपल्या प्रेमाच्या भावना व्यक्त केल्या. आई–वडील, आजी– आजोबा, भाउ, बहीण, जवळचे मित्र यांच्याबाबत प्रेम व्यक्त करत त्यांनाही शुभेच्छा देण्यात आल्या.

गुलाबाच्या किंमती गगनाला

व्हॅलेंटाईन डे आणि गुलाब हे अतुट समिकरण आहे. यामुळेच गुलाबाच्या किंमती गगनाला भिडल्या होत्या.

उद्याने, महाविद्यालांबाहेर पोलीसांचा बंदोबस्त

या ठिकाणी सकाळपासूनच पोलिसांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. शहरातील विविध महाविद्यालयांच्या बाहेरही पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात होता. साध्या वेशातील पोलिसही महाविद्यालयांच्या बाहेर बंदोबस्तासाठी तैनात होते. निर्भया पथकही महाविद्यालयांवर गस्त घालत होते.

चौघांवर कारवाई

निर्भया पथकाने रंकाळा पदपथ उद्यान येथे कारवाई करून चार प्रेमियुगुलांना ताब्यात घेतले. त्यांना जुना राजवाडा पोलीस स्टेशनमध्ये नेवून पालकांसमोर समज देण्यात आली.

तरुण भारत
शुक्रवार, १५ फेब्रुवारी २०१९

नाण्यांमुळे देशाची प्रगती ओळखली जाते

इचलकरंजी : प्राचीन काळापासून नाण्यांमुळेच देशाची अथवा राष्ट्राची प्रगती दिसून येते. मानवी जीवनात राहणीमानाचा दर्जा, विकास व प्रगती ही त्या काळातील नाण्यांवर दिसून येते. विविध पद्धतीचे चित्रे, गणपती, ओम, स्वस्तिक इ.वरुन देशाची प्रगती समजते. मानवी जीवनाची यशस्वी वाटचाल नाणी व नोटा यांच्या विपणनावर दिसून येते. असे मत नाणी संग्राहक दत्तात्रय ठाणेकर यांनी मांडले.

दत्तात्रय ठाणेकर यांचे मत

श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग व शिवराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नोटा व चलनी नाण्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहूणे ठाणेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.अनिल पाटील उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ.अनिल पाटील म्हणाले की इतिहास विभागामार्फत हा स्तूत्य उपक्रम असून आधुनिक काळातील मुला-मुलींनी त्या काळातील चलनी नाण्यांचा विकास समजतो. प्रास्ताविक कु.दिपाली कांबळे हिने तर पाहुण्यांची ओळख इतिहास विभाग प्रमुख प्रा.पल्लवी मिरजकर यांनी केले.

कन्या महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

इचलकरंजी : शिवाजी विद्यापिठ अंतर्गत आंतर विभागीय खो-खो व व्हॉलीबॉल स्पर्धेत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या दोन्ही संघानी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत धनश्री दगडू कुंभार बी.कॉम भाग ३ या खेळाडूची शिवाजी विद्यापिठ खो-खो संघात निवड झाली आहे. तसेच निकीता संभाजी चव्हाण बी.कॉम भाग १ हिची शिवाजी विद्यापिठ व्हॉलीबॉल संघात निवड झाली. या दोघी खेळाडू दि १३ ते १८ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सवात सहभागी होणार आहेत. या खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सविता भोसले, सुखदेव सजगणे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल त्यांचे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक – शिक्षकेत्तर विद्यार्थीनींनी अभिनंदन केले.